म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

४८

संग्रहालय क्रमांक

४६
५८५

पुस्तकाचें नांव

४६

इति

९०७

इतिहास

इ २.९४

स्थळ ६१९ ९

# श्री शृङ्गेरीमठ.

हा शिरोलिखित मठ मुख्य कोणता, यासंबंधानें आलीकडे पुष्कळ लोकांच्या मनांत शंका उत्पन्न झाली आहे. कारण, शृंगगिरी ऊर्फ शृंगेरी या नांवाच्या तुंगातीरीं असलेल्या गांवांत वरील मठ आहे; तथापि कुडली, कुंभकोण, आमनी, हंपी, करवीर, पुष्पगिरी, शिवगंगा इत्यादि स्थलीं शृंगेरी मठाच्या नांवानें मोडणारे मठ आहेत. तेव्हां दक्षिणेस जो मठ श्री शंकराचार्यांनीं स्थापन केला, तो कोणता, अशी शंका उत्पन्न होणें हें साहजिक आहे. करितां त्या शंकानिरासार्थ शास्त्रीय व लौकिक जीं प्रमाणें मिळतात, तीं एकत्र करून, त्यांतून जो मथितार्थ निघतो तो सर्वांस कळावा एतदर्थ हा प्रयत्न आहे. या प्रयत्नानें उभयप्रमाणविमुख लोकांची समजूत होईल, अशी आशा आहे. हा मथितार्थ अवलोकन करण्यापूर्वी, श्री जगद्गुरू शंकराचार्य यांणीं हा मठ कोठें व केव्हां स्थापन केला, याविषयीं थोडासा इतिहास सांगणें आवश्यक वाटल्यावरून, तो येथें देतों.

आदि श्रीमच्छंकराचार्य यांणीं सन्यासदीक्षा ग्रहण करून कर्ममार्गोच्छेद करावयास मंडनमिश्रांशीं वाद करून त्यास जिंकिलें. तेव्हां त्याची स्त्री जी सरसवाणी तिणेंही आचार्यांस, कामशास्त्रांत नायकनायिकाभेद कसा आहे, त्याविषयीं विचारिलें. तें ऐकून आचार्यांनीं तिशीं सहा महिन्याचा वायदा केला आणि परकायाप्रवेशविधेनें अमरुकराजाच्या राज्याचा कांहीं दिवस उपभोग घेतला. नंतर सरसवाणीस जिंकून मंत्रबद्ध करून या शृंगपुराजवळ तुंगभद्रातीरीं चक्र निर्माण करून त्यावर तिची स्थापना केली आणि तिला, कल्पपर्यंत स्थिर ऐस, अशी आज्ञा केली, व तेथें आपला एक मठ स्थापिला. त्यांत विद्यापीठ स्थापन करून आपल्या शिष्यांस भारतीसंप्रदाय दिला. तेथें आचार्य शुद्धाद्वैतविद्येचा उपदेश

करीत बारावर्षे राहिले. नंतर आपल्या शिष्यमंडळींतील सुरेश्वर नांवाच्या शिष्यास पीठाध्यक्ष करून, आपण देशसंचारार्थ गेले.

सदरील माहिती आनंदगिरिकृत 'शंकरविजय' ग्रंथांतून घेतली आहे. ती पुढें लिहिल्याप्रमाणें:—

प्रकरण ६१ । ६२ । ६३.

आचार्यस्ततः शिष्यजनसेव्यमानः शीघ्रं मण्डनमिश्रपुरं प्राप्य गगनासनस्थां सरसवाणीं दृष्ट्वा परमतत्वरूपिणीं सर्वकलावतीं, मातस्त्वत्कृतरतिशास्त्रप्रश्नानामुत्तरं अद्यैव वक्ष्यामि । वाङ्मत्रेणैव सर्वज्ञा सरसवाणी सर्वज्ञस्त्वमिति स्वामिनं प्रस्तुतवत्यासीत् । ततस्त्वाचार्योऽपि विदितसमस्तपदार्थः कृतार्थो बभौ ॥ ६१ ॥

ततःपरं सरसवाणीं मन्त्रबद्धां कृत्वा गगनमार्गादेव शृङ्गपुरसमीपे तुङ्गभद्रातीरे चक्रं निमार्य तदग्रे सरसवाणीं निधाय एवमाकल्पं स्थिरा भव मदाश्रमे, इत्याज्ञाप्य निजमठम् कृत्वा तत्र विद्यापीठनिर्माणं कृत्वा भारतीसम्प्रदायम् निजाशिष्यं चकार । तदारभ्य शुद्धाद्वैतगुरवो भारतीसम्प्रदायनिष्ठाः परमगुरोराचार्यस्वामिनः कटाक्षपरिलब्धविद्या वैशद्यायेति व्यवहारः । + + ॥ ६२ ॥

तत्र परमगुरुर्द्वादशाब्दं विद्यापीठे स्थित्वा बहुशिष्येभ्यः शुद्धाद्वैतविद्यायाः सम्यगुपदेशं कृत्वा तदनन्तरं कंचिच्छिष्यम् सुरेश्वराख्यं पीठाध्यक्षं कृत्वा स्वयं निश्चक्राम । + + ॥ ६३ ॥

याचप्रमाणें माधवाचार्य ( विद्यारण्य ) यांणीं केलेल्या 'शंकरविजयां' त शृंगेरीवर स्थापिलेला मठ मुख्य व तेथेंच विद्यापीठ निर्माण केलें, असें आहे. याहापेक्षां स्पष्ट माहिती चिद्विलासकृत 'शंकरविजयां' त आहे. तीः—

वाग्देव्यास्सविधे तस्मिन् गोपुराट्टालसंयुतं ॥ श्रीमठं तत्र निर्माय विद्यापीठमचीकरत् ॥ चतुर्ष्वेकं वावदूकं सुरेशाचार्यमग्रिमं ॥ ब्रह्मविद्यावरिष्ठं तं तत्पीठे विनिवेश्य सः ॥ आज्ञापयत्सुरेशार्यमित्थं देशिकपुंगवः ॥ आसेतुहिमवच्छैलं सदाचारान्विचारय ॥ तत्र स्खलति यःकोवा विप्रस्तं शिक्षयाधिकं ॥ संप्रदायान्दशैवैतान् शिष्येष्वाचारय स्वतः ॥ तीर्थाश्रमवनारण्यगिरिपर्वतसागराः ॥ सरस्वती भारतीवि पुरीत्येवे दशैवःहि ॥ शिवात् क्रमात्

समायातं चन्द्रमौलीश्वरंपरम् ॥ रत्नगर्भं गणपतिं पूजयेति ददौ मुदा ॥ यावत्सन्यासिनां धर्मान् सदाचारान् प्रवर्तयेति ॥

या वर दिलेल्या प्रमाणांवरून तुंगातीरीं असलेल्या शृंगपुराजवळील जो श्रीमठ, तोच आदि होय हें निश्चित होतें. या प्रमाणांशिवायही **शिवरहस्यांत** तुंगातीरीं मठ स्थापन करण्याविषयीं प्रमाण आहे तें:—

दुर्वासशापतो भूमौ जातां वाणीं विजित्य च ॥ अगस्त्यचरिते देशे तुंगातीरे सुनिर्मले ॥ पुण्यक्षेत्रे द्विजवर स्थापयित्वा सुपूजय ॥ मलहानिकरं लिंगं विभांडकसुपूजितं ॥ यत्रास्ते ऋष्यशृंगस्य महर्षेराश्रमो महान् ॥ कलावपि ततोद्वैतमार्गः ख्यातो भविष्यतीति ॥

असो; येथपर्यंत दिलेल्या आधारावरून, तुंगातीरीं असलेल्या श्रीमठांतच आदिशंकराचार्यांनीं सरस्वतिस्थापन केलें, त्यामुळें या मठास शारदापीठ असें नांव पडलें; तसेंच या मठांत सुरेश्वराचार्य यांस अध्यक्ष नेमिल्यामुळें व या मठामागून इतर मठ स्थापन झाल्यामुळें, हा मठ सर्व मठांत आदि व विशेष मान्य आहे हें निःसंशय आहे.

आदि श्रीशंकराचार्य कधीं झाले व त्यांचें निर्वाण कोणत्या स्थलीं झालें, याबद्दल पुष्कळांचा मतभेद आहे; तथापि त्यांस हजारो वर्षें झालीं याविषयीं अगदीं शंका नाहीं. कारण मोठमोठे जे प्रसिद्ध माधवाचार्य, हर्षमिश्र, वाचस्पतिमिश्र, पक्षधरमिश्र, उदयनाचार्य इत्यादि विद्वान ग्रंथकर्ते झाले, त्यांस श्रीशंकराचार्य हे अत्यंत मान्य आहेत. आचार्यांच्या शिष्यवर्गानीं अद्वैतप्रकरणांवर जे ग्रंथ केले आहेत, त्यावरून व इतर पुष्कळ प्रमाणांवरून श्रीआचार्यांचा काल आम्हीं वर लिहिल्याप्रमाणें फार प्राचीन आहे; तथापि श्रीमदाचार्य अमक्या कालीं होते असें शंकरविजयादिग्रंथांत प्रमाण सांपडत नाहीं. अद्वैतवाद्यांचे जे प्रतिपक्षी *जैन त्यांच्या ग्रंथांत याविषयीं प्रमाणें आढळतात. आनंदगिरिकृत 'शंकरविजयांत' दुसऱ्या प्रकरणांत, चिदंबर पुरांत राहणाऱ्या सर्वज्ञ नांवाच्या कुलीन

*हीं जैन ग्रंथांची प्रमाणें 'भरतखंडाचा अर्वाचीन कोश करणारे' रघुनाथ भास्कर गोडबोले याणीं, महत्प्रयासानें मिळविलीं, म्हणून लिहिलें आहे; पण तीं कोठें मिळालीं, तें लिहिल असतें म्हणजे फार उत्तम झालें असतें! पुढें लिहिलेलीं सर्व जैन प्रमाणें अर्वाचीन कोशांतीलच आहेत.

करीत बारावर्षे राहिले. नंतर आपल्या शिष्यमंडळींतील सुरेश्वर नांवाच्या शिष्यास पीठाध्यक्ष करून, आपण देशसंचारार्थ गेले.

सदरील माहिती आनंदगिरिकृत 'शंकरविजय' ग्रंथांतून घेतली आहे. ती पुढें लिहिल्याप्रमाणें:—

प्रकरण ६१ । ६२ । ६३.

आचार्यस्ततः शिष्यजनसेव्यमानः शीघ्रं मण्डनमिश्रपुरं प्राप्य गगनासनस्थां सरसवाणीं दृष्ट्वा परमतत्वरूपिणीं सर्वकलावतीं, मातस्त्वत्कृतरतिशास्त्रप्रश्नानामुत्तरं अद्यैव वक्ष्यामि । वाङ्मात्रेणैव सर्वज्ञा सरसवाणी सर्वज्ञस्त्वमिति स्वामिनं प्रस्तुतवत्यासीत् । ततस्त्वाचार्योऽपि विदितसमस्तपदार्थः कृतार्थो बभौ ॥ ६१ ॥

ततःपरं सरसवाणीं मन्त्रबद्धां कृत्वा गगनमार्गादेव शृङ्गपुरसमीपे तुङ्गभद्रातीरे चक्रं निमार्य तदग्रे सरसवाणीं निधाय एवमाकल्पं स्थिरा भव मदाश्रमे, इत्याज्ञाप्य निजमठम् कृत्वा तत्र विद्यापीठनिर्माणं कृत्वा भारतीसम्प्रदायम् निजाशिष्यं चकार । तदारभ्य शुद्धाद्वैतगुरवो भारतीसम्प्रदायनिष्ठाः परमगुरोराचार्यस्वामिनः कटाक्षपरिलब्धविद्या वैशद्यायेति व्यवहारः । + + ॥ ६२ ॥

तत्र परमगुरुर्द्वादशाब्दं विद्यापीठे स्थित्वा बहुशिष्येभ्यः शुद्धाद्वैतविद्यायाः सम्यगुपदेशं कृत्वा तदनन्तरं कंचिच्छिष्यम् सुरेश्वराख्यं पीठाध्यक्षं कृत्वा स्वयं निष्क्राम । + + ॥ ६३ ॥

याचप्रमाणें माधवाचार्य (विद्यारण्य) यांणीं केलेल्या 'शंकरविजयां' त शृंगेरीवर स्थापिलेला मठ मुख्य व तेथेंच विद्यापीठ निर्माण केलें, असें आहे. याहापेक्षां स्पष्ट माहिती चिद्विलासकृत 'शंकरविजयां' त आहे. ती:—

वाग्देव्यास्सविधे तस्मिन् गोपुराट्टालसंयुतं ॥ श्रीमठं तत्र निर्माय विद्यापीठमचीकरत् ॥ चतुर्ष्वेकं वावदूकं सुरेशाचार्यमग्रिमं ॥ ब्रह्मविद्यावरिष्ठं तं तत्पीठे विनिवेश्य सः ॥ आज्ञापयत्सुरेशार्यमित्थं देशिकपुंगवः ॥ आसेतुहिमवच्छैलं सदाचारान्विचारय ॥ तत्र स्खलति यःकोवा विप्रस्तं शिक्षयाधिकं ॥ संप्रदायान्दशैवैतान् शिष्येष्वाचारय स्वतः ॥ तीर्थाश्रमवनारण्यगिरिपर्वतसागराः ॥ सरस्वती भारतीवि पुरीत्येवे दशैव हि ॥ शिवात् क्रमात्

समायातं चन्द्रमौलीश्वरंपरम् ॥ रत्नगर्भं गणपतिं पूजयेति ददौ मुदा ॥ यावत्सन्यासिनां धर्मान् सदाचारान् प्रवर्तयेति ॥

या वर दिलेल्या प्रमाणांवरून तुंगातीरीं असलेल्या शृंगपुराजवळील जो श्रीमठ, तोच आदि होय हें निश्चित होतें. या प्रमाणांशिवायही **शिवरहस्यांत** तुंगातीरीं मठ स्थापन करण्याविषयीं प्रमाण आहे तें:—

दुर्वासशापतो भूमौ जातां वाणीं विजित्य च ॥ अगस्त्यचरिते देशे तुंगातीरे सुनिर्मले ॥ पुण्यक्षेत्रे द्विजवर स्थापयित्वा सुपूजय ॥ मलहानिकरं लिंगं विभांडकसुपूजितं ॥ यतास्ते ऋष्यशृंगस्य महर्षेराश्रमो महान् ॥ कलावपि ततोद्वैतमार्गः ख्यातो भविष्यतीति ॥

असो; येथपर्यंत दिलेल्या आधारावरून, तुंगातीरीं असलेल्या श्रीमठांतच आदिशंकराचार्यांनीं सरस्वतीस्थापन केलें, त्यामुळें या मठास शारदापीठ असें नांव पडलें; तसेंच या मठांत सुरेश्वराचार्य यांस अध्यक्ष नेमिल्यामुळें व या मठामागून इतर मठ स्थापन झाल्यामुळें, हा मठ सर्व मठांत आदि व विशेष मान्य आहे हें निःसंशय आहे.

आदि श्रीशंकराचार्य कधीं झाले व त्यांचें निर्वाण कोणत्या स्थलीं झालें, याबद्दल पुष्कळांचा मतभेद आहे; तथापि त्यांस हजारो वर्षें झालीं याविषयीं अगदीं शंका नाहीं. कारण मोठमोठे जे प्रसिद्ध माधवाचार्य, हर्षमिश्र, वाचस्पतिमिश्र, पक्षधरमिश्र, उदयनाचार्य इत्यादि विद्वान ग्रंथकर्ते झाले, त्यांस श्रीशंकराचार्य हे अत्यंत मान्य आहेत. आचार्यांच्या शिष्यवर्गांनीं अद्वैतप्रकरणांवर जे ग्रंथ केले आहेत, त्यावरून व इतर पुष्कळ प्रमाणांवरून श्रीआचार्यांचा काल आम्हीं वर लिहिल्याप्रमाणें फार प्राचीन आहे; तथापि श्रीमदाचार्य अमक्या कालीं होते असें शंकरविजयादिग्रंथांत प्रमाण सांपडत नाहीं. अद्वैतवाद्यांचे जे प्रतिपक्षी *जैन त्यांच्या ग्रंथांत याविषयीं प्रमाणें आढळतात. आनंदगिरिकृत 'शंकरविजयांत' दुसऱ्या प्रकरणांत, चिदंबर पुरांत राहणाऱ्या सर्वज्ञ नांवाच्या कुलीन

*हीं जैन ग्रंथांची प्रमाणें 'भरतखंडाचा अर्वाचीन कोश करणारे' रघुनाथ भास्कर गोडबोले यांणीं, महत्प्रयासानें मिळविली, म्हणून लिहिलें आहे; पण ती कोठें मिळाली, तें लिहिल असतें म्हणजे फार उत्तम झालें असतें! पुढें लिहिलेलीं सर्व जैन प्रमाणें अर्वाचीन कोशांतीलच आहेत.

विद्वान ब्राह्मणास, कामाक्षी नांवाच्या स्त्रियेपासून विशिष्टा नांवाची कन्या झाली. ती आठ वर्षांची झाल्यावर विश्वजित् नांवाच्या विद्वान् ब्राह्मणास तिला दिली. तिच्या उदरीं श्रीशंकराचार्य हे झाले असें आहे. प्रसिद्ध 'जिनविजय' ग्रंथांतही श्री आचार्यांच्या संबधानें असाच लेख आहे, तो पुढें लिहिल्याप्रमाणें:—

*ऋषिर्बाणस्तथा भूमिर्मर्त्याक्षौ वाममेलनात् ॥ एकत्वेन लभेदंकस्ताम्राक्षस्तद्धि वत्सरः ॥ विश्वजिच्च पिता यस्य विख्यातश्च चिदंबरे ॥ तस्य भार्याबिका देवी शंकरं लोकशंकरं ॥ प्रसूता सर्वलोकस्य तारणाय जगद्गुरुं ॥

यावरून ह्मणजे आनंदगिरी यांणीं लिहिलेल्याचा व जैनाच्या ग्रंथाचा मेळ मिळत असल्यावरून, जैनानीं लिहिल्याप्रमाणें आचार्यांस २८३१ वर्षें होऊन गेलीं असावीत असें दिसतें. या प्रमाणाशिवाय जैनग्रंथांतील दुसरेंही आणखी एक प्रमाण आढळतें तें पुढें लिहिल्याप्रमाणें:—

ऋषिर्वसुर्वसुर्ज्ञेयो पांडवानां महात्मनां ॥ गणना शेषकालस्य शकस्य शिवजन्मनि ॥

ह्मणजे—जेव्हां आचार्यांचा जन्म झाला, त्यावेळीं युधिष्ठिर शकाच्या ३०४४ वर्षां (एकंदर युधिष्ठिर शक ३०४५ वर्षें आहे.) पैकीं ८८७ वर्षें भरावयाचीं होतीं. या दोन प्रमाणांवरून आचार्यांच्या जन्मकाळास आजला पावणेतीन हजारांवर वर्षें झालीं हें निःसंशय ठरतें. माधवाचार्य (विद्यारण्य) यांणीं केलेल्या शंकरविजयांतील आचार्यांच्या कालास व जनग्रन्थांतील प्रमाणांस मेळ मिळत असल्यावरून, हे आचार्य मुख्य आचार्यांच्या मागून १४४३ वर्षांनीं झाले असावे असें वाटतें.

माधवकृत शंकरविजयांतः—

ततो महेशः किलकेरलेषु श्रीमद्वृषाद्रौ करुणासमुद्रः ॥ पूर्णानदीपुण्यतटे स्वयंभूलिंगात्मनानंगवगाविरासीत् ॥ * * * लग्ने शुभे शुभयुते सुषुवे कुमारं श्रीपार्वतीव सुखिनी शुभवीक्षिते च ॥ जाया सती शिवगुरोर्निजतुंगसंस्थे सूर्ये कुजे रविसुते च गुरौ च केंद्रे ॥

जैनग्रन्थांतील प्रमाणः—

---

*युधिष्ठिर २१५७ समजावयाचा.

भूमिर्नेत्रे मानवस्य कस्यास्थानां च मेलनात् ॥ वामगत्या शुभे काले प्रमाथी व-त्सरे महान् ॥ शालिवाहनराज्ञश्च वर्तते उत्तमः शकः ॥ मल्लचाळे माघकृष्णे च चतुर्दश्यां शुभे दिने ॥ पिता शिवगुरुर्यस्य माता च गिरिजा सती ॥ द्वितीयः शंकरः साक्षाद्वदन्ति मुनयः सदा ॥ जाते पंचदशे वर्षे शृंगिरौ गमनं कृतं ॥ विद्याभ्यासं नन्दवर्षे कृत्वाथाश्रममाप्तवान् ॥ विद्यान्तसिंहयतिना भारतीनां मठे शुभे ॥ स्वकीये स्थापयामास विद्याशंकरभारतीम् ॥ ततः पंचदशे वर्षे जयार्थमटनं कृतं ॥ निर्जिताशेषपृथिवी वादेन स्वीयविद्यया ॥ पश्चाद्गत्वा अकूपारे स्नानार्थं सूर्यपर्वणि ॥ तस्मिन्देशे निर्मले च समाप्तिमगमद्गुरुः ॥ भूमिर्नंदो द्रुहीणस्य वदनानि च मेलनात् ॥ कार्तिक्यां शुक्लपक्षेथ त्रयोदश्यां शुभे दिने ॥ विरोधी काव्यवारे च सायान्हे कीकटे महान् ॥ सप्राप्तिमगमत्साक्षाद्विद्याशंकरभारती ॥

या प्रमाणावरून पाहतां, शिवगुरुपुत्र जे श्रीशंकराचार्य, त्यांचा जन्मकाल शालिवाहन शक ४२१ होय आणि निर्वाण काल ४९१ होय. याशिवाय शालिवाहन शक ७१० यांतही आचार्यजन्म झाल्याबद्दल वर्णन आहे; पण यास जैनग्रंथांत प्रमाण नाहीं. हा वरील शक जो काढला, तो पुढील आधारावरून होय.

प्रासूत तिष्यशरदामतियातवत्यामेकादशाधिकशतोनचतुःसहस्र्याम् ॥

ह्मणजे—या वर लिहिलेल्या तिसऱ्या आचार्यजन्मकालाचे वेळीं कलियुगाची ३८८९ वर्षें गेलीं होतीं.

या एकंदर प्रमाणांचा विचार करतां असें निःसंशय ठरतें कीं, श्रीमच्छंकराचार्य यांच्या संबंधानें जे त्यांच्या शिष्यवर्गांनीं ग्रंथ केले आहेत, त्यांत त्यांणीं आचार्यांच्या जन्मकालाविषयीं वगैरे कोणत्याहि प्रकारें वर्णन केलेलें आढळत नाहीं. त्यामुळें आचार्यांस होऊन अमुक वर्षें झालीं, याबद्दल आमच्या ग्रंथांतून निश्चयात्मक असें प्रमाण नाहीं. जैनग्रंथांतील जीं प्रमाणें वर दिलेलीं आहेत, तीं कितपतशीं विश्वसनीय आहेत, त्याविषयीं दुसरें कांहीं प्रमाण सांपडत नाहीं. शिवाय हे उतारे 'जिनविजय' नामक जैनग्रंथांतील आहेत ते 'अर्वाचीनकोश' कर्त्यांनीं कोठें मिळविले व कोणापासून मिळविले तेही लिहिले नाहीं. यामुळें थोडासा संशय उत्पन्न होतो. कोल्हापूरप्रांतांत जैनाचे ग्रंथ बरेच उपलब्ध आहेत, शिवाय ये

विद्वान ब्राह्मणास; **कामाक्षी** नांवाच्या स्त्रियेपासून **विशिष्टा** नांवाची कन्या झाली ती आठ वर्षांची झाल्यावर **विश्वजित्** नांवाच्या विद्वान् ब्राह्मणास तिला दिली. तिच्या उदरीं श्रीशंकराचार्य हे झाले असें आहे. प्रसिद्ध 'जिनविजय' ग्रंथांतही श्री आचार्यांच्या संबधानें असाच लेख आहे, तो पुढें लिहिल्याप्रमाणें:—

*ऋषिर्बाणस्तथा भूमिर्मर्त्याक्षौ वाममेलनात् ॥ एकत्वेन लभेदंकस्ताम्राक्षस्तद्वि वत्सरः ॥ विश्वजिच्च पिता यस्य विख्यातश्च चिदंबरे ॥ तस्य भार्यांबिका देवी शंकरं लोकशंकरं ॥ प्रसूता सर्वलोकस्य तारणाय जगद्गुरुं ॥

यावरून ह्मणजे आनंदगिरी यांणीं लिहिलेल्याचा व जैनाच्या ग्रंथाचा मेळ मिळत असल्यावरून, जैनानीं लिहिल्याप्रमाणें आचार्यांस २८३१ वर्षें होऊन गेलीं असावीत असें दिसतें. या प्रमाणाशिवाय जैनग्रंथांतील दुसरेंही आणखी एक प्रमाण आढळतें तें पुढें लिहिल्याप्रमाणें:—

ऋषिर्वसुर्वसुर्ज्ञेयो पांडवानां महात्मनां ॥ गणना शेषकालस्य शकस्य शिवजन्मनि ॥

ह्मणजे–जेव्हां आचार्यांचा जन्म झाला, त्यावेळीं युधिष्ठिर शकाच्या ३०४४ वर्षां ( एकंदर युधिष्ठिर शक ३०४५ वर्षें आहे. ) पैकीं ८८७ वर्षें भरावयाचीं होतीं. या दोन प्रमाणांवरून आचार्यांच्या जन्मकाळास आजला पावणेतीन हजारांवर वर्षें झालीं हें निःसंशय ठरतें. माधवाचार्य ( विद्यारण्य ) यांणीं केलेल्या शंकरविजयांतील आचार्यांच्या कालास व जनग्रन्थांतील प्रमाणांस मेळ मिळत असल्यावरून, हे आचार्य मुख्य आचार्यांच्या मागून १४४३ वर्षांनीं झाले असावे असें वाटतें.

माधवकृत शंकरविजयांत:—

ततो महेशः किलकेरलेषु श्रीमद्वृषाद्रौ करुणासमुद्रः ॥ पूर्णानदीपुण्यतटे स्वयंभूलिंगात्मनानंगवगर्विरासीत् ॥ * * * लग्ने शुभे शुभयुते सुषुवे कुमारं श्रीपार्वतीव सुखिनी शुभवीक्षिते च ॥ जाया सती शिवगुरोर्निजतुंगसंस्थे सूर्ये कुजे रविसुते च गुरौ च केंद्रे ॥

जैनग्रन्थांतील प्रमाण:—

---

*युधिष्ठिर २१५७ समजावयाचा.

भूमिर्नेत्रे मानवस्य कस्यास्थानां च मेलनात् ॥ वामगत्या शुभे काले प्रमाथी वत्सरे महान् ॥ शालिवाहनराज्ञश्च वर्तते उत्तमः शकः ॥ मल्लचाळे माघकृष्णे च चतुर्दश्यां शुभे दिने ॥ पिता शिवगुरुर्यस्य माता च गिरिजा सती ॥ द्वितीयः शंकरः साक्षाद्वदन्ति मुनयः सदा ॥ जाते पंचदशे वर्षे शृंगिरौ गमनं कृतं ॥ विद्याभ्यासं नन्दवर्षे कृत्वाथाश्रममाप्तवान् ॥ विद्यान्त्सिंहयतिना भारतीनां मठे शुभे ॥ स्वकीये स्थापयामास विद्याशंकरभारतीम् ॥ ततः पंचदशे वर्षे जयार्थमटनं कृतं ॥ निर्जिताशेषपृथिवी वादेन स्वीयविद्यया ॥ पश्चाद्गत्वा अकूपारे स्नानार्थं सूर्यपर्वणि ॥ तस्मिन्देशे निर्मले च समाप्तिमगमद्गुरुः ॥ भूमिर्नंदो द्रुहीणस्य वदनानि च मेलनात् ॥ कार्तिक्यां शुक्लपक्षेथ त्रयोदश्यां शुभे दिने ॥ विरोधी काव्यवारे च सायान्हे कीकटे महान् ॥ समाप्तिमगमत्साक्षाद्विद्याशंकरभारती ॥

या प्रमाणावरून पाहतां, शिवगुरुपुत्र जे श्रीशंकराचार्य, त्यांचा जन्मकाल शालिवाहन शक ४२१ होय आणि निर्वाण काल ४९१ होय. याशिवाय शालिवाहन शक ७१० यांतही आचार्यजन्म झाल्याबद्दल वर्णन आहे; पण यास जैनग्रंथांत प्रमाण नाहीं. हा वरील शक जो काढला, तो पुढील आधारावरून होय.

प्रासूत तिष्यशरदामतियातवत्यामेकादशाधिकशतोनचतुःसहस्र्याम् ॥

ह्मणजे—या वर लिहिलेल्या तिसऱ्या आचार्यजन्मकालाचे वेळीं कलियुगाची ३८८९ वर्षें गेलीं होतीं.

या एकंदर प्रमाणांचा विचार करतां असें निःसंशय ठरतें कीं, श्रीमच्छंकराचार्य यांच्या संबंधानें जे त्यांच्या शिष्यवर्गांनीं ग्रंथ केले आहेत, त्यांत त्यांणीं आचार्यांच्या जन्मकालाविषयीं वगैरे कोणत्याहि प्रकारें वर्णन केलेलें आढळत नाहीं. त्यामुळें आचार्यांस होऊन अमुक वर्षें झालीं, याबद्दल आमच्या ग्रंथांतून निश्चयात्मक असें प्रमाण नाहीं. जैनग्रंथांतील जीं प्रमाणें वर दिलेलीं आहेत, तीं कितपतशीं विश्वसनीय आहेत, त्याविषयीं दुसरें कांहीं प्रमाण सांपडत नाहीं. शिवाय हे उतारे 'जिनविजय' नामक जैनग्रंथांतील आहेत ते 'अर्वाचीनकोश' कर्त्यांनीं कोठें मिळविले व कोणापासून मिळविले तेही लिहिले नाहीं. यामुळें थोडासा संशय उत्पन्न होतो. कोल्हापूरप्रांतांत जैनाचे ग्रंथ बरेच उपलब्ध आहेत, शिवाय ये

थील राजारामकॉलेजांत, जुन्या जैनग्रंथांचा संग्रह बराच होत आहे. त्यांत व जैनधर्माचे पुष्कळ माहितगार आहेत त्या लोकांस विचारतां, वरील प्रमाणांस आधारभूत असलेल्या ' जिनविजया ' चें कोठें नांवही ऐकण्यांत येत नाहीं. दुसरें असें कीं, या ' जिनविजयांत ' जें वर्णन आढळतें, तें जैनलोकांनीं केलें किंवा कसें ह्याविषयीं निश्चय नाहीं, ह्मणून हीं प्रमाणें. यांस दुसरा आधार मिळाल्याशिवाय, प्रमाणभूत धरून चालणें योग्य होणार नाहीं.*

येथपर्यंत लिहिलेल्या लेखावरून सर्वांस कळून येईल कीं, आजपर्यंत मोठमोठ्या एतद्देशीय व इंग्लिश विद्वान लोकांनीं श्रीमदाचार्यांच्या संबंधानें जे लेख लिहिले तें अनुमानानें लिहिलें. यामुळें वर जे आह्मीं लिहिले आहे, कीं या कालनिर्णयास विशेष असें प्रमाण आढळत नाही; तथापि श्रीमदाचार्यांस आजला हजारो वर्षें झालीं हें निःसशय आहे, तेंच खरें होय. या आमच्या ह्मणण्यास, या श्री शृंगागिरि मठाकडून एक गुरुपरंपरेची यादि मिळाली आहे. तें प्रमाण आहे. ही यादि बळूनें कापडाच्या चोपडीवर लिहिलेली अशी फारच जुनी आहे. त्यांत आदि श्री शंकराचार्य यांणीं विक्रम शक २२ त सन्यास घेतला व ४६ व्या शतकांत त्यांचें निर्वाण झालें असे आहे. अर्थात श्री आचार्य हे संन्यासग्रहणानंतर २४ वर्षें पावेतो होतें. हें संन्यासग्रहण ८ व्या वर्षी झालें, तींहि वर्षें यांत मिळविली असतां, श्रीमदाचार्यांचा अवतार भूलोकांवर एकंदर ३२ वर्षें होता असें ठरतें.

श्री आचार्यांच्या नंतर सुरेश्वराचार्य ( मंडनमिश्र ) हे सिंहासनारूढ झाले. त्याणीं विक्रम शक ३० तच संन्यास ग्रहण केलें होतें. ते योगबळानें फार वर्षे ह्मणजे सव्वासातशे वर्षें राहिले. यासंबंधानें पुष्कळ लोक शंका घेतात; पण ज्यांस योगशास्त्राची माहिती आहे व ज्यापेक्षां आलिकडील देखील कांहीं कांहीं विद्वान या शास्त्राच्या सत्यतेबद्दल आपली खात्री करून घेत आहेत, त्यापेक्षां सुज्ञ मनुष्य याचा सहज निर्णय करूं शकतील. तसेंच या यादींत प्रसिद्ध श्री विद्यारण्य यांणीं शालिवाहन शक १२५३ मध्यें सन्यास घेतला व शके १३०२ मध्यें समाविस्थ झाले असें आहे. यावरून विद्यारण्य यांस होऊन सहाशें वर्षें होत आ-

* असा स्पष्ट लेख लिहिण्याचें कारण, जर कोणाला या श्रीमदाचार्यांच्या जन्मकालासंबंधानें वगैरे कांहीं प्रमाणें मिळालीं असतील, तर तीं त्यांणीं कळवावींत हें होय.

लीं असें दिसतें. ही वर लिहिलेली गुरुपरंपरेची यादी आह्मीं पुढें दिलेली आहे, तीवरून मूळच्या श्री शंकराचार्यांपासून आजपर्यंत जे एकंदर ३२ आचार्य झाले, ते कधीं संन्यस्त झाले व कधीं समाविस्थ झाले तें समजेल. या एकंदर आचार्यांत २ रे आचार्य–सुरेश्वराचार्य व १२ वे आचार्य–विद्यारण्य हे दोघेच कायते गृहस्थाश्रमस्थ होते. बाकीचे सगळे ब्रह्मचर्यव्रतस्थ होते. सांप्रतचे जे मठाधिपति आहेत, ते ब्रह्मचर्यव्रतस्थ असून यांणीं आपल्या वयाच्या १९ व्या वर्षीं संन्यासदीक्षा घेतली. याप्रमाणेंच बहुतेक मठाधिपति सिंहासनारूढ होण्याच्या पूर्वीं कांहीं दिवस संन्यासदीक्षा घेऊन आश्रमधर्माभ्यास करीत. सांप्रतच्या अधिपतींनींहि त्याप्रमाणेंच संन्यासधर्माभ्यास व संप्रदायाप्रमाणें यथोचित शास्त्राभ्यासही केला आहे. पुष्कळ अनुभविक लोक सांगतात कीं, या श्री गेरी पीठावर जे जे आचार्य आरूढ झाले. ते ते सर्व विद्वान् झाले, इतकेंच हें तर त्यांणीं नानाप्रकारच्या शास्त्रीयविषयावर ग्रंथ केले आहेत. याप्रमाणें हें शारदापीठ अन्वर्थतेप्रत पावलें आहे, हें ऐकून कोणास आनंद होणार नाहीं. दुसरी एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, श्री शंकराचार्य यांस श्री शिवापासून मिळालेल्या दोन मूर्ति–चन्द्रमौलीश्वर व रत्नगर्भगणपति–या मठांतच आहेत व खरोखरच त्या प्रेक्षणीय आहेत.

ह्या श्री शृंगगिरिमठाधिपतींना परधर्मीयांनीं देखील त्यांच्या संस्थानच्या खर्चाबद्दल व आत्मोन्नत्यर्थ मोठमोठालीं वतनें दिलीं आहेत. या वतन देणाऱ्यांत ब्राह्मणद्वेष्टे टिपुसुलतान आणि हैदरअल्ली हे आहेत. हैदराबादचे निजाम यांजकडूनही, आपल्या सर्व प्रांतात या मठाचाच पूर्वापार धर्माधिकार चालत असल्याबद्दल आणि फकीर वगैरे लोकांना जो धर्म होतो, त्यांतील देखील अंश या मठास देत जावा याबद्दल, विज्ञापनालेख दिलेले आहेत. याचप्रमाणें म्हैसुरचे महाराज कृष्णराज वडेर यांचींहि विज्ञापनापत्रें आहेत- हैदराबादेस कुडलगीकरांनीं फिर्याद केली होती कीं, या शृंगगिरिमठस्थांस इकडे फिरण्याचा हक्क नाहीं. त्याचा निकाल शृंगेरी मठाच्या तर्फें झाला, तो वाचण्या सारखा आहे. त्यांत स्पष्ट लिहिलें आहे कीं, इतर क्षुद्र मठस्थांनीं या प्रांतांत बिलकुल फिरूं नये. वनपार्तिराजा व म्हैसुरचे महाराज यांच्या गांवगन्ना अशाच ताकिदी आहेत. हे दक्षिण भागांत

झाले. उत्तर भागांतही-बडोदा, इंदूर, देवासें, ग्वाल्हेर, भावनगर इत्यादि संस्थानिकांचीं आपापल्या प्रांतांत या मठाचाच अधिकार असल्याबद्दल * विज्ञापनापत्रें आहेत. इतकेंच केवळ नव्हें, तर तसाच क्रम अजून चालत आहे हें त्या पत्रांवरून दिसून येईल. श्री. बाळाजी बाजीराव पेशवे यांचेंही असेंच विज्ञापनापत्र आहे. करवीर ऊर्फ कोल्हापूर येथील ही श्री शंभुछत्रपतींनीं देवपूजनास चांगली नेमणूक करून दिली आहे. शिवाय नासिक, ब्रह्मावर्त इत्यादि जीं प्रसिद्ध क्षेत्रें आहेत. तेथील क्षेत्रस्थ याच मठाला मान देतात. थोड्या दिवसांपूर्वी द्वारकेच्या मठाधिकाऱ्यांबद्दल सुरतेस $ संवाद चालला होता. त्यावेळीं महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस, रामदिक्षीत आपटे इत्यादि मोठमोठ्या विद्वानानीं देखील स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, दक्षिण दिशेकडे श्री आचार्यांनीं स्थापिलेला आदिमठ शृंगगिरींतील होय. कुडलगी, कुंभकोण, करवीर वगैरे शाखामठ आहेत.

असा; या एकदर माहितीवरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, श्री आचार्यांनीं मडनामश्रास व सरस्वतीस जिंकून तुगातीरीं ज्याठिकाणीं या दोघांनां स्थापिलें, तें स्थान शृंगगिरी ऊर्फ शृंगेरी हेंच होय- इतर कुंभकोण, कुडलगी, हंपी, करवीर वगैरे ठिकाणचे जे मठ या शृंगेरीनांवाखाला मोडतात, ते सर्व शाखामठ होत.

---

*हीं सर्व विज्ञापना पत्रें पुढें दिलेलीं आहेत. शिवाय आणखीही कांहीं पत्रें प्रस्तुतच्या राज्याधिकाऱ्यांकडुन मिळालेलीं दिलीं आहेत.

$या वादाच्या एकदर हकीकतीचे 'संशयतिमिरभास्कर' या नांवाचें एक पुस्तक छापलें आहे, तें विज्ञापनापत्रासहीत या मठाकडे आलें आहे. सुरतेच्या दोहोपक्षांनींही, श्री शृंगेरीमठाकडून या संबंधानें अभिप्राय मिळावा ह्मणून विज्ञप्ति केली आहे.

श्री

(शिक्का)

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६५ कालयुक्तनामसंवत्सरे भाद्रपद शुद्ध पंचमी सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी यांणीं चातुर्वर्ण्यधर्म-
कुमुदवनीसंस्थापनविला(ल)सनपटुतरचन्दीर(चन्द्र)
(शिक्के २) मारीषदसी (शि) कवर्याधिष्ठान शृंगेरीमठ संस्थान
यांसि दिलें वर्षासनपत्र ऐसेंजे श्रीचे पूजानैवेद्यास
हुजरुन प्रतिवर्षी ऐवज नेमून दिला असे होनपा—

* * स्थानबीहतरहोन राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकत
* * १०० सदारपैकीं होन१००
* * होन रास देविले असेत सदरहू * * दरसाल
प्रविष्ट होईल मठाचे स्वामी * * आहे ऐवज बीनाकसूर प्रविष्ट होईल
जाणीजे निदेश समक्ष (शिक्का)

---

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य पदवाक्यप्रमाणपारावारपारीण यमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठ तपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्य व्याख्यानसिंहासनाधीश्वर सकलनिगमागमसारहृदय सांख्यत्रयप्रतिपादक वैदिकमार्गप्रवर्तक सर्वतन्त्रस्वतन्त्रादि राजधानीश्रीविद्यानगर महाराजधानीकर्नाटक सिंहासनप्रतिष्ठापनाचार्य श्रीमद्राजाधिराजगुरु भूमण्डलाचार्य ऋष्यशृंगपुरवराधीश्वर तुंगभद्रातीरवासि श्रीमद्विद्याशंकरपादपद्माराधक श्रीमन्नृसिंहभारतीगुरुकरकमलसंजात शृंगेरी सच्चिदानन्दभारतीस्वामियतिवर्यचरणकमलेषु ॥

(शिक्का)

छात्रगणगणनीय पण्डित बाजीरावबल्लाळप्रधान विहित विनन्तिसहस्त्रमजस्त्रं विशेष मुकाम प्रतिष्ठान गंगातीर येथें राजश्री सुबराउकोनेरी व राजश्री रामचन्द्रभट्ट पौराणिक व मल्हारउद्धवयांणीं अग्रपूजाप्रचारविषई विनन्ति केली व पूर्वीएतद्विषईआ-

---

*येथील मजकूर गेलेला आहे.

ज्ञापव स्वामीचें सादर ज्ञालें होतें त्यावरून या गोष्टीनें सर्वांचें कल्याण व राज्याची अभिवृद्धि ऐसें जाणून प्रांत पुणें प्रांत जुन्नर प्रांव गंगथडी येथील सकल सत्कर्मारंभीं गुरुवग्र(गुर्वग्र)पूजास्वामीचे चरणारविंदीं संकल्पून हे सनद पाठविली असे वर स्वामीनीं प्रतिक्षेत्रीं नगरीं ग्रामीं शिष्यवर्ग पाठवून अग्रपूजा घेतली पाहिजे शके १६६१ सिद्धार्थिनामसंवत्सरे फाल्गुन बहुळपंचमी वाछं १८ जिल्हेज मुरुसन आर्बैन मैय्या व अल्लफ सेवेसी श्रुव होय हे विज्ञप्ति.

( शिक्का. )

---

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्येत्यादि विरुदांकित शृंगेरीश्रीजगद्गुरु श्रीमन्नृसिंहभारतीस्वामिनां अखिलगुणमणनिलयमहीपतिकिरीटकोटिस्फुट-वरमणिगणकिरणमंजरीपंजरीकृत श्रीमच्चरणारविंदेषु ॥

तादृश श्रीगुरुचरणनखचन्द्रकिरणनिर्धूततमःप्राग्भारमनोनिलयविद्योतमान-ज्ञानरत्नसच्छिष्यसन्दोह छात्रगणगणनीय श्रीमदब्भवाखण्डलप्रमुखविबुधमण्डल-मुकुटमणिमण्डितचरणपुण्डरीकशशिखण्डमण्डनानुग्रहसमासादिताविरतानुपमसंपद्विल-सित भाग्यनगराधिष्ठित राजचन्दुलालबहादूर कृतससाष्टांगप्रणामपूर्वक विज्ञाप-ना ॥ श्रीमत् श्रीपाद चरण यांही श्रीमहायात्रानिमित्त लोकोद्धार करावे याकरितां एतत्प्रांतीं दिग्विजय जाहला येणेंकरून आम्हांस श्रेयस्कर व या राज्यास अभिवृद्धि व्हावी म्हणोन प्रार्थना करणें ऐसीजे या राज्यांत असणार कर्मसन्यासी व दशनामसन्यासो व अवधूत आदिकरून ब्रह्म क्षत्री वैश्य शूद्र इत्यादि अष्टादशवर्ण षण्मतस्थांस श्री स्वामिचरणानि निग्रहानुग्रहरूपानुशासन करून आपआपले स्वधर्मो-चरणी प्रवर्तवून धर्म आचन्द्रार्कस्थाइ व्हावयाजोगी व्यवस्था करवून आम्हांस व या राज्यांस निरन्तर कल्याणाभिवृद्धि व्हावे म्हणून प्रार्थना करून विनन्तिपत्र व याविषयीं हरकोणी तकरार करूं नये सबब सरकारचें वाकीदपत्रसुद्धां श्रीमत् श्रीपादचरणारविंदीं समर्पण केलें आहे तर श्रीस्वामीनीं सर्व बंदोबस्त करवून धर्मसंस्थापन होऊन अखिललोकोद्धार करावयास स्वामी स्वतन्त्र आहात हें लेखन करून समर्पिलें जयपत्र सही शके १७६५ शोभननामसंवत्सर चैत्रवद्य ५

श्रीशंकराचार्यजगद्गुरु

राजेश्री फत्तेशिंग गाइकवाड समशेर
बहादर गोसावियांसि

छ अखण्डितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें विशेष श्री स्वामी शृंगेरीकर हे जगद्गुरु सर्वांस पूज्य यांची पूजा केलिया श्रेयस्कर जाणून तुम्हांस हें पत्र लिहिलें असे तरी आपले तालुक्यांत ताकीद करून स्वामीचे शिष्य येतील त्यांस सकल सत्कर्मारंभीं स्वामीची अग्रपूजा देवीत जाणें जाणीजे छ ११ साबान सुरुसन इहिद्दे सब्बै मय्या व अल्लफ

---

श्रीम्हालसाकांतप्रसन्न

राजश्री त्रिंबकरामशास्त्री वहिवाटदार
पो वडनगर गोसावि यांसि

छ अखण्डित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री गणपतराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादूर दण्डवत सुरुन इहिद्दे खमसीन मय्यातैन वअल्लफ श्रीमत्परमहंसपरिव्राजिकाचार्य श्रीशंकराचार्यस्वामी नृसिंहभारती मुख्यगादी संस्थान शृंगिरी कर्नाटक यांची स्वारी महालमजकुरीं आल्यास त्यांजला तुम्हीं सामोरे एक कोसपावेतों पागा शिबंदी वगैरे सरंजामानिशी जाऊन त्यांजला सन्मानयुक्त गांवांत आणोन त्यांचे धर्मांप्रमाणें राहाण्यास चांगली जागा देऊन स्वामीवरावर दररोज शंभर रुपयांचे तारिखेचा खर्च आहे त्याबद्दल सामान सरंजाम अगर तितके रुपये प्रथमदिवशीं द्यावे आणि दुसरेदिवशीं स्वामी महालचे कचेरींत सन्मानयुक्त आणोन त्यांचे पूजेबद्दल रुपये १०० द्यावे आणि स्वामी तेथें राहातील तोंपावेतों जाबत्यास शिपाई ठेऊन जातील तेव्हां त्यांजबरोबर आपले दुसरे माहालचे हद्दीचें ठाणें लागेतोंपावेतों पांच स्वार व पांच शिपाई देऊन पावते करावे येविशींचा बोभाट येऊं देऊं नये व सदरहू पूजाखर्चांचे रुपये माहालीं शेट

महाजन वगैरे सावनुक करुन खर्च करणें जाणिजे छ २१ माहे भमवले ऊर्फ फाल्गुनमास संवत् १९०७ (मोर्तबसुद)

---

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्येइत्यादि विरुदांकित शृंगेरी जगद्गुरु नृसिंहभारतीमहास्वामिनां अखिलगुणगणनिलयमहीपतिकिरीटकोटिस्फुटतरमणिगणकिरणमंजरीपंजरीकृतश्रीमच्चरणारविंदेषु ॥

(शिक्का.)

ताद्दश श्रीगुरुचरणनखचंद्रकिरणनिर्धूततमःप्राग्भारमनोनिलयविद्योतमानज्ञानरत्नसच्छिष्यसंदोह छात्रगणगणनीय श्रीमदब्जभवाखंडलप्रमुखविबुधमंडलमुकुटमणिमंडितचरणपुन्डरीक शशिखंडमंडनानुग्रहसमासादिताविरतानुपमसंपद्विलसित गालेवाश्रमपरिसरवर्तिसेनानिवेशाविष्ठित सिंदे इत्युपनामक जयाजीराव आलीजाबाहादुर कृताष्टांगदंडवत् प्रणामपूर्वक विज्ञापना श्रीमत् श्रीपादचरण यांहीं श्री महायात्रानिमित्त लोकोद्धार करावयाकरितां एतत्प्रांतीं दिग्विजय झाला येणेंकरून आह्मांस श्रेयस्कर आणि या राज्यास अभिवृद्धि व्हावी ह्मणून प्रार्थना करणें ऐशीजे या राज्यांत असणार कर्मसंन्यासी व दशनामसन्यासी व अवधूत आदिकरून ब्रह्म क्षत्र वैश्य शूद्र इत्यादि अष्टादश वर्ण षण्मतस्थांस श्री स्वामिचरणानि निग्रहानुग्रहरूप अनुशासन करून आपआपले स्वधर्माचरणीं प्रवर्तवून धर्म आचंद्रार्क स्थायी व्हावयाजोगी व्यवस्था करवून आह्मांस व या राज्यास निरन्तर कल्याणाभिवृद्धि व्हावी ह्मणून प्रार्थना करून विनंतिपत्र श्रीमत्श्रीपादचरणारविंदीं समर्पण केलें आहे तर श्री स्वामीनीं सर्व बंदोबस्त करून धर्मसंस्थापना होऊन अखिललोकोद्धार करावयास स्वामी स्वतन्त्र आहात हें लेखन करून समर्पिलें असे मिती भाद्रपद बहुल ३० संवत १९०६ शके १७७१ शेबोरी श्रुत होय हे विज्ञापना.

(शिक्का.)

